Established: July 2001

II TAMASO MA JOTIRGAMAY II

TALE VIBHAG SHIKSHAN PRASARAK MANDAL'S

D.G. TATKARE ARTS & COMMERCE COLLEGE, TALA

Tal. Tala, Dist. - Raigad - 402 111.

Permanently Affiliated to University of Mumbai, NAAC Accredited with CGPA of 3.07 at 'A' Grade

Best College Award 2023-2024

Phone/ Fax: 02140 269575 / 9273499354, E-mail: dgtcollegetala1@yahoo.co.in

Govt. Recognized wide lettes No. NCC/Mashi-3 Date 29 Jan.2001 Muvis. 2003/(2/03) Mashi. 03 Dated 3 June 2003

Registration No. - 66 / 1988

Ref. No.: /20 /20 Date: / /20

स्त्रि नोंदणी उपक्रम-२०२५

तटकरे कॉलेज,तळा येथे स्त्री शक्ती नोंदणी उपक्रम संपन्न

तळे, (पु. गो. मुळे) – तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे द. ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय, तळा राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि महिला सबलीकरण कक्ष आयोजित स्त्रीशक्ती नोंदणी उपक्रम दिनांक ८ ऑक्टोबर २०२५ रोजी राबवण्यात आला. यामध्ये विद्यार्थिनींना या पोर्टलवर नोंदणी करण्यास प्रोत्साहित करण्यात आले.

संपूर्ण महाविद्यालयांमध्ये याविषयी जनजागृती करण्यात आली. महिलांना सामाजिक, आर्थिक आणि राजकीयदृष्ट्या अधिक सक्षम करणे, महिलांना व्यवसाय सुरू करण्यासाठी किंवा त्याचा विस्तार करण्यासाठी आर्थिक सहाय्य देणे, महिलांना व्यावसायिक आणि कौशल्य–आधारित प्रशिक्षण कार्यक्रम उपलब्ध करून देणे, महिलांना संकटकाळात मदत मिळवण्यासाठी आणि स्वतःची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी मार्गदर्शन करणे, हा उद्देश होता.

या कार्यक्रमासाठी राष्ट्रीय सेवा योजना विभागातील कार्यक्रमाधिकारी डॉ.दत्ता कुंटेवाड महिला सबलीकरण कक्ष समन्वयक डॉ.तृप्ती थोरात यांनी सदर कार्यक्रमाचे आयोजन केले ,संपूर्ण कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. बी एम.लोखंडे यांचे सहकार्य लाभले.हा कार्यक्रम

यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले तर या प्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राध्यापिका, प्राध्यापकेत्तर कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लाडक्या बहिणींना धक्का

(पान १ वरून)

राहण्याची भीती आहे.लाडकी बहीण योजनेसाठी प्रक्रिया पूर्ण करताना येत असलेल्या तांत्रिक अडचणींमागे महत्त्वाचे कारण समोर आले आहे. काही जाणकारांच्या मते, या ऑनलाइन पोर्टलच्या सर्व्हरवर प्रचंड ताण येत असल्यामुळे ही समस्या निर्माण झाली आहे. साठी जो सर्व्हर उपलब्ध करून दिला आहे, त्याची तांत्रिक ताकद आणि त्यावर येणारा कामाचा लोड यात मोठा फरक आहे. अनेक महिला किंवा त्यांना मदत करणारी मंडळी मोबाईलवर हे पोर्टल ओपन करतात आणि काम झाले किंवा नाही झाले, तरी ते आपले लॉगिन बंद करत नाहीत. यामुळे सर्व्हरवर अतिरिक्त आणि अनावश्यक लोड तयार होतो. परिणामी, इतरांना या सर्व्हरचा ॲक्सेस मिळत नाही आणि मोबाईलवर ट्रॅफिक जाम असा मेसेज दाखवतो. या समस्येवर मात करण्यासाठी आणि महिलांचे हाल थांबवण्यासाठी जाणकारांनी दोन महत्त्वाचे उपाय सुचवले आहेत. पहिला म्हणजे मोबाईलवर हे पोर्टल ओपन होणे तात्पुरते बंद करावे. जेणेकरून अनावश्यक लोड कमी होईल आणि दुसरं म्हणजे तातडीने सर्व्हरची कॅपॅसिटी वाढवावी. यामुळे महिलांना वारंवार हेलपाटे मारावे लागणार नाहीत आणि त्यांचे एकाच प्रयत्नात पूर्ण होऊन त्या समाधानाने घरी जाऊ शकतील.

लाडकी बहीण योजनेच्या प्रक्रियेत तांत्रिक अडचणींसोबतच विधवा महिलांना एक विशेष आणि गंभीर अडचण भेडसावत आहे. साठी नेमका कोणता पर्याय निवडावा किंवा कोणाचे आधार कार्ड वापरावे, याबद्दल स्पष्ट मार्गदर्शन नसल्याने त्या गोंधळाच्या मनःस्थितीत आहेत. योजनेच्या नियमांनुसार किंवा सध्याच्या प्रक्रियेनुसार साठी संबंधित